131

Z. P. JALGAON.
Reference No. 113
Govt. Commr.
H.D. L.A.O. Other
Dept.
25 MAR 1983
Date of Receipt
Initials
Work Sheet No.

प्राथमिक शाळा इमारतींच्या बांधकामासाठी
ग्रामपंचायतींना कर्ज देण्याची योजना.

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन परिपत्रक क्र.प्राशाइ १०८३/५४५९७(४१७४)प्राशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक २२ मार्च, १९८३

परिपत्रक:- राज्यांतील बहुसंख्य प्राथमिक शाळा भाड्याच्या इमारतींमध्ये, चावड्यांमध्ये, तर काही देवळांमध्ये अथवा तत्सम सार्वजनिक ठिकाणी भरतात. अशा इमारतींमधील वातावरण शिक्षणासाठी पोषक असतेच असे नाही. त्याकरिता शाळांसाठी इमारती बांधणे आवश्यक आहे. सांगली सोलापूर व अमरावती जिल्हा परिषदांनी यासाठी ग्राम पंचायतीस ग्राम विकास निधीमधून कर्ज देण्याच्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. त्यापैकी सांगली जिल्हा परिषदेच्या योजनेची माहिती सोबत जोडली आहे. ही योजना इतर जिल्हा परिषदांना अनुकरणीय असून तीमुळे प्राथमिक शाळा इमारतींचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. सर्व जिल्हा परिषदांनी त्याबाबत विचार करून व या योजनेमध्ये आवश्यक वाटल्यास काही फेरफार करून ती आपल्या जिल्ह्यामध्ये अंमलात आणण्याचा प्रयत्न करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(य. सो. नार्वेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, नाशिक, अमरावती.
ग्राम विकास विभाग.

सांबरेकर/१८.३

133 135 135

| | |
|---|---|
| १] योजनेचे नांव | जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज योजना. |
| २] योजना केव्हापासून सुरु आहे. | सन १९६६ पासून. |
| ३] जिल्हा परिषदेतर्फे त्या खाली किती कर्ज दिले जाते? | अंदाजपत्रकीय खर्चाच्या ७५ टक्के तसेच संबंधित ग्राम पंचायतीची आर्थिक स्थिती व कर्ज परत फेडीची कुवत पाहून तिचेकडून परत फेड होईल इतकीच रक्कम कर्ज म्हणून दिली जाते. |
| ४] प्रत्येक खोलीचा खर्च किती ग्राहय धरला जातो? | रुपये २८,०००/- |
| ५] या कर्जाची परतफेड कशी करण्यात येते? | परत फेड दरवर्षी समान हप्त्याने १० वर्षात व्याजासह केली जाते. |
| ६] व्याजाचा दर काय? | शेकडा ५ टक्के. जर ग्रामपंचायतीने व्याज व मुद्दल वेळेवर वा मुदतीत परतफेड न केल्यास मुद्दल व व्याज याचे थकित हप्त्यावर शेकडा २ टक्के दंड व्याजाची आकारणी केली जाते. |
| ७] शाळा इमारतीची मालकी कोणाची? | १] संबंधित ग्राम पंचायतीने स्वत:चे फंडातून व कर्ज घेऊन बांधकाम केले असेल तर त्याची मालकी ग्राम पंचायतीची राहते. २] शासनाकडून जिल्हा परिषदेकडून पंचायत समितीकडून अनुदान घेतले असल्यास त्यांची मालकी जिल्हा परिषदेची राहते. |
| ८] यासाठी दरवर्षी किती खोल्यासाठी किती ग्राम पंचायतींना कर्ज दिले जाते? | मागणी प्रमाणे पूर्तता होतेच. येणारी मागणी पूर्ण करण्यात येते. सरासरी ३० खोल्यासाठी ३० ग्राम पंचायतींना कर्ज दिले जाते. |
| ९] त्यासाठी एकूण किती तरतूद केली जाते? | जिल्हा ग्रामपंचायत निधी अधिनियम १९५८ मधील कलम १३३ प्रमाणे. |
| १०] शेरा. | सदरची कर्ज योजना ग्रामपंचायतींना त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता न परवडणारी आहे. कारण ८० टक्के ग्रामपंचायतींची आर्थिक स्थिती त्यांचाच खर्च भागविणेसाठी असमाधानीय असते. तेव्हा शासनाने याकामी १०० टक्के अनुदान द्यावे किंवा रु. ४,०००/- ऐवजी रुपये १२,०००/- प्रत्येक खोलीस द्यावेत. |

२३ जानेवारी शासनाला [illegible]

सही/-
शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर.

Scanned with OKEN Scanner